# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०५/२०२६ ( मंगळवार )

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी IIIT कॉलेज वारंगा येथील विदयार्थ्याच्या निधना प्रकरणी IIIT कॉलेजला भेट देवुन विदयार्थ्यांशी साधला संवाद

आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी IIIT कॉलेज वारंगा येथे एका विद्यार्थ्याच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर तसेच तेथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या संदर्भात भेट दिली. सदर भेटी दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांनी विद्यार्थ्यांशी तसेच प्रशासनाशी संवाद साधून त्यांच्या तक्रारी व मते जाणून घेतली तसेच विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत मा. पोलीस अधिक्षकांनी कॉलेज प्रशासनाला आपत्कालीन प्रतिसादासाठी मानक कार्यपद्धती (SOP) तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

# घरफोडीचे १० गुन्हे उघड, १ आरोपी अटक,
# ९ लाख ६१ हजार ८१७ रूपयांचा मुद्देमाल जप्त
# स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०५/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदाराकडुन माहीती मिळाली की, जिल्हा धार राज्य मध्यप्रदेश येथील घरफोडी गुन्हे करणारे ३ सराईत गुन्हेगार नागपुर ते भंडारा रोडवरील मौजा उमरी फाटा येथे बॅग घेवुन वाहनाची वाट पाहत उभे आहेत. अशी माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी पोहचुन बातमीची शाहनिशा केली. ३ इसम मोठी ट्रॅव्हल बॅग सोबत एक लहान बॅग घेवुन रोडवर वाहनांची वाट पाहत उभे असल्याचे दिसुन आले. पोलीसांना पाहुन नमुद आरोपी पळु लागले. त्यापैकी **आरोपी नामे सुनिल कैलाससिंग बरनाल, वय ३० वर्ष, रा. गंधवाणी बारिया पोलीस ठाणे गंधवाणी, जि. धार, राज्य मध्यप्रदेश याला पोलीसांनी शिताफिने ताब्यात घेतले.**

आरोपी नामे सुनिल कैलाससिंग बरनाल याला ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याचे ताब्यातील बॅगची पाहणी केली असता त्यामध्ये घरफोडी गुन्हे करण्याकरीता वापरण्यात येणारे साहित्य मिळुन आले. एका बॅगमध्ये सोन्याचांदीचे दागिने व नगदी रोख मिळुन आले. नमुद आरोपीकडे कौशल्यापुर्ण विचारपुस केली असता त्याने याचे इतर ०२ साथीदारासह पोलीस स्टेशन मौदा, रामटेक, बोरी, एमआयडीसी बोरी, बेला, कन्हान,कोंढाळी, काटोल, जलालखेडा, परिसरात घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबुल केले आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) सोने ७६.२१ ग्रॅम किंमती ९,१४,५२०/—रूपये, २) चांदी १४३.१९ ग्रॅम किंमती ३५,७९७/— रूपये, ३) रोख रक्कम १०, ००० /—रूपये, ४) घरफोडी चे साहित्य आणि बॅग एकूण किंमत १५०० /—रूपये असा एकूण किंमती ९,६१,८१७/— रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पोस्टे मौदा अप क्रमांक १४९/२०२६ कलम ३३१(३), ३०५ (अ) भा.न्या.सं.
२) पोस्टे मौदा अप क्रमांक ३०७/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अं)भा.न्या.सं.
३) पोस्टे रामटेक अप क्रमांक २९१/२०२६ कलम ३३१(४),३०५(अंभा.न्या.सं.
४) पोस्टे एमआयडीसी बोरी अप क्रमांक ६६/२०२६ कलम ३३१(४),३०५(अं)भा.न्या.सं.
५) पोस्टे जलालखेडा अप क्र. ९७/२०२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५(अं)भा.न्या.सं.
६) पोस्टे कोंढाळी अप क्र. १५०/२०२६ कलम ३३१(४),३०५(अ)भा.न्या.सं.
७) पोस्टे बोरी अप क्र. २०६/२०२६ कलम ३३१(४),३०५(अं)भा.न्या.सं.
८) पोस्टे काटोल अप क्र. ३४४/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४),३०५(अं)भा.न्या.सं.
९) पोस्टे कन्हान अप क्र. २०४/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४),३०५(अं)भा.न्या.सं.
१०) पोस्टे बेला अप क्र. २०/२०२६ कलम ३३१(४),३०५(अ)भा.न्या.सं.




**गुन्हे उघड करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# पोलीस स्टेशन वडोदा येथील दाखल गुन्हयातील १०५ किलोग्रॅम गांजा वाहतुक करणारे २ आरोपी अटकेत स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा :— दिनांक ०२/०५/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना रात्री विभागिय गस्त दरम्यान उमरी फाटा येथुन २०० मिटर पुढे रोडच्या कडेला ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ ट्रकच्या कॅबीन आणि डाल्यातुन पंचासमक्ष वेगवेगळया प्लास्टिक चुंगडयांमध्ये हिरवा काळपट रंगाचा पाने फुले, बिया, कळी, देड, बोंडे असलेला गांजा मिळुन आला होता. पोलीसांनी एकुण वजन १०५.१ किलोग्रॅम गांजा एकुण किंमत २१,०२,०००/— रूपये , ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ किंमती ४०,००,०००/— रूपये आणि दोन मोबाईल किंमती १०,०००/— रूपये असा एकुण किंमती ६१,१२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ८ (क), २०(ब) (ii) (सी) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयातील आरोपी हे पोलीसांना पाहुन वाहन सोडुन पळुन गेले होते.**

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सदर गुन्हयातील आरोपीचा तात्काळ शोध घेण्याचे आदेश निर्गमित केले. स्थनिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे दिनांक ०४/०५/२०२६ रोजी नमुद गुन्हयातील आरोपी **क्रं १) ट्रक क्र. एम एच ४० बी एल ४४४५ चा चालक — प्रणयसिंग अमरसिंग दशमेर,वय २० वर्षे, रा. पिपरिया, तह. कुरई, जिल्हा शिवणी याला वाराशिवणी जि.बालाघाट, राज्य मध्य प्रदेश येथुन आणि आरोपी क्रं २) क्लिनर — रोहित रामप्रसाद मरकाम, वय १९ वर्षे, रा.पिपरिया ता. कुरई, जि. शिवणी, राज्य मध्य प्रदेश याला पिपरिया, जि.शिवणी** येथुन ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असुन नागपुर ग्रामीण पोलीस साखळी पुरावे जोडुन पुढील तपास करीत आहेत.

# अल्पवयीन बालीकेसोबत लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला मा.न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन कुही** :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कुही येथे अप क्र. ११४/२०२४ कलम ३७६(१), ३७६(२),(एन), ३७६ एबी भांदवि सह कलम ४, ६ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०३/०३/२०२४ रोजी फिर्यादी ही तिचे पतिसह मजुरीच्या कामाला गेली असता त्यांची अल्पवयीन पिडीत मुलगी वय १० वर्ष ही घरी एकटीच हजर असताना यातील **आरोपी नामे शिवशंकर गोविंदा मेश्राम, वय २४ वर्ष, रा. उडम, ता. कुही, जि. नागपूर** हा सदर गुन्हयातील अल्पवयीन पिडीत मुलीच्या घरी येवुन ‘‘माझे घरी लहान ताई आहे खेळायला चल’’ असे म्हणुन आरोपीने तिला सोबत त्याच्या घरी घेवुन गेला आणि बळजबरीने तिचेवर लैंगिक अत्याचार केला.

श्री हरीहर सोनकुसरे, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक पोलीस स्टेशन कुही यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०५/०५/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ०३ श्री एस. एच. ग्वालानी यांनी नमुद आरोपी नामे शिवशंकर गोविंदा मेश्राम, वय २४ वर्ष, रा. अडम, ता. कुही, जि. नागपूर यास कलम ३७६ (१),३७६ (२)(एन),३७६(एबी) भादवि सह कलम ४ आणि ६ पोक्सो मध्ये दोषी ठरवुन त्याला कलम ६ पोक्सो अन्वये २० वर्ष सश्रम कारावास व १०,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती कल्पना पांडे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्रीमती वृष्टी जैन उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कुही , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार सफौ संतोष गुंटीवार ब. नं. २२६ नेमणुक पोलीस स्टेशन कुही यांनी मदत केली आहे.

# अल्पवयीन बालकावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला मा न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन नरखेड** :— फिर्यादी यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन नरखेड येथे अप क्र. ३३०/२०२३ कलम ३७७ भांदवि सहक. ४ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ३०/०७/२०२३ रोजी फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय ०६ वर्षे व मुलगी वय ०५ वर्षे हे त्यांच्या घरा समोरील गार्डनमध्ये खेळत असता यातील आरोपी योगेश उर्फ राहुल वासुदेव रेवतकर, वय २२ वर्ष, रा. रा. नरखेड, वार्ड नं. ४, नरखेड याने पिडीत अल्पवयीन बालक, वय ६ वर्षे याला १०/— रूपयांचे आमिष देवुन त्याचे घरी वरील मजल्यावर नेवुन त्याचे सोबत अनैसर्गिक कृत्य करून त्याचेवर लैंगिक अत्याचार केला.

श्रीमती सारिका गुरूकर, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक पोलीस स्टेशन नरखेड यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०५/०५/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ०३ श्री एस. एच. ग्वालानी यांनी नमुद आरोपी नामे योगेश उर्फ राहुल वासुदेव रेवतकर, वय २२ वर्ष, रा. रा. नरखेड, वार्ड नं. ४, नरखेड याला ४ (२) पोक्सो अन्वये २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती कल्पना पांडे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती मोकाशे ,प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन नरखेड, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४, नेमणुक दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार पोअं हिमांशु वंजारी, ब. नं. १३४४ नेम पोलीस स्टेशन नरखेड यांनी मदत केली आहे.

# नरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध जुगार खेळणाऱ्यांवर ०२ गुन्हे नोंद, एकुण २,४१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०४/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन नरखेड यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण २४१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) विजय गुणवंता कानडे, वय ४० वर्ष, २) विजय प्रतापराव ठाकरे, वय ५४ वर्ष, ३) उमेश रामक्रिष्णा तिजारे, वय ४८ वर्ष, ४) प्रमोद पंढरीनाथ गोल्लर, वय ४० वर्ष, सर्व रा. पिंपळगाव वखाजी यांचेवर यांचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. तसेच ५) प्रकाश मारोतराव तुमडाम, वय ५६ वर्ष ६) संजय गाणपतराव सर्याम, वय ४० वर्ष ७) भुषण प्रभुजी भुजाडे, वय ४१ वर्ष, ८) नामदेव संतोष सोनेकर, वय ४० वर्ष, सर्व रा. पिंपळगाव वखाजी हे लोकांकडुन पैसे घेवुन ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना/खेळवताना मिळुन आल्याने त्याचे वर ०१ गुन्हा नोंद आहे. असे २ गुन्हे नोंद, अशा ०८ आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०२ गुन्हे दाखल केले आहे.

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक ०४/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) योगेश्वर चोखीनाथ चनकापूरे, वय ५६ वर्षे, रा. मोहगाव भदाडे, ता. नरखेड २) पुरूषोत्तम राघोजी बावने, वय ६७ वर्षे, रा मोहगाव भदाडे, ता नरखेड हे मौजा पिपळा केवळराम शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७५७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २० आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १८ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३५ आरोपी अशा एकुण १८९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने